# १. आनंदी-आनंद गडे !

**बालकवी**

**त्र्यंबक बापूजी ठोमरे** (जन्म : १८९०, मृत्यू : १९१८.) यांची 'श्रावणमासी हर्ष मानसी' ही कविता तुम्ही यापूर्वी वाचली आहे. त्या कवितेत बालकवींनी निसर्गाचे कसे सुंदर वर्णन केले आहे, याचा प्रत्यय तुम्हांला आलाच असेल. बालकवी हे निसर्गाचे कवी. मुलाफुलांचे कवी. 'बालकवींची कविता' या नावाने त्यांचा कवितासंग्रह प्रसिद्ध आहे. त्यातूनच 'आनंदी-आनंद गडे !' ही कविता घेतली आहे.

सृष्टीत सर्वत्र भरलेल्या आनंदाचे वर्णन या कवितेत कवीने केले आहे.

आनंदी-आनंद गडे,          इकडे, तिकडे, चोहिकडे
वरती-खाली, मोद भरे,      वायूसंगे मोद भरे
　　　　नभात भरला,
　　　　दिशांत फिरला,
　　　　जगात उरला,
मोद विहरतो चोहिकडे,      आनंदी-आनंद गडे !

सूर्यकिरण सोनेरी हे,          कौमुदि ही हसते आहे;
खुलली संध्या प्रेमाने,          आनंदे गाते गाणे;
　　　　मेघ रंगले,
　　　　चित्त दंगले,
　　　　गान स्फुरले,
इकडे, तिकडे, चोहिकडे      आनंदी-आनंद गडे !

वाहति निर्झर मंदगती          डोलति लतिका वृक्षतती,
पक्षि मनोहर कूजित रे,      कोणाला गातात बरे ?
　　　　कमल विकसले,
　　　　भ्रमर गुंगले,

डोलत वदले—
इकडे, तिकडे, चोहिकडे, आनंदी–आनंद गडे !

स्वार्थाच्या बाजारात किती पामरे रडतात
त्यांना मोद कसा मिळतो ? सोडुनि स्वार्था तो जातो–
द्वेष संपला,
मत्सर गेला,
आता उरला,
इकडे, तिकडे, चोहिकडे, आनंदी–आनंद गडे !



मोद – आनंद; कौमुदी – चांदणे; वृक्षतती – झाडांची रांग; पामर – दीन व्यक्ती.

अभ्यास :

१. कोणाकोणास आनंद झाला आहे ? त्यांना झालेला आनंद कशाकशांत दिसून येतो ?
२. स्वार्थाच्या बाजारात किती पामरे रडतात;
त्यांना मोद कसा मिळतो ? सोडुनि स्वार्था तो जातो—या ओळींचा अर्थ स्पष्ट करा.
३. कविता गुणगुणताना किंवा गाताना विशेष आनंद का वाटतो ?